महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२३-२४/ 2345 दिनांक:- 23 JUL 2024

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :** श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.

संदर्भ :-१. मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे परीपत्रक. जा.क्र.१८/तंशिसं /वेबनार/ २०२४/३००/ दि.२२/०७/२०२४
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४ दि . ०८/०७/२०२४

उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत तंत्रशिक्षण संचालनाल्य, म.रा. मुंबई, यांच्या अखत्यारितील विविध मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभुत प्रवेश पध्दतीने प्रवेश घेणा-या EWS, SEBC ,OBC प्रवर्गातील मुलीना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, उच्च व तंत्र शिक्षण विभागाव्दारे, विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणा-या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरिता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दिनांक २५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० च्या दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

तरी सर्व संस्थांना कळविण्यात येते की, या कार्यक्रमाचे **Live प्रक्षेपण** आपापल्या संस्थांमध्ये मोठया पडद्यावर (Screen वर ) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल. अश्या पध्दतीची व्यवस्था करून आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थी व पालक तसेच संस्था प्रतिनिधी ने सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहावे.
या कार्यक्रमासाठी Webinar link ची लिंक खालील प्रमाणे आहे.
**http://www.parthlive.com**

सहपत्र:- (संदर्भिय पत्र क्र. ०१ संलग्न)

( डॉ. सचिन वि. सोलंकी )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८७/८६, ई-मेल- desk18@dtemaharashtra.gov.in,

वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**महत्वाचे परिपत्रक**

जा क्र. १८ /तंशिसं/वेबिनार/२०२४/३००

दिनांक: २२ जुलै २०२४

**विषय:** श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.

**संदर्भ:** शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४ , दि.८ जुलै,२०२४

उपरोक्त संदर्भान्वये शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP ) (व्यवस्थापन कोटयातील/ संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 8.00,लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूवीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूवीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची महिती देण्याकरिता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दिनांक २५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्राना कळविण्यात येते की, या कार्यक्रमाचे **LIVE प्रक्षेपण** आपापल्या **संस्थांमध्ये मोठ्या पडद्यावर (Screen वर) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल** अश्या पद्धतीची व्यवस्था करण्यात यावी व या करिता आपापल्या संस्थेतील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहणे बाबत सूचना आपल्यास्तरावरून देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालील प्रमाणे आहे.

http://www.parthlive.com

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत महितीकरिता:

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत आवश्यक कार्यावहिकरिता:

सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपापल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठे, संस्थांना या बाबत अवगत करावे.